Vol 4 Issue 4 Oct 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-4 | Oct-2014
Available online at www.aygrt.isrj.org

अण्णा भाऊ साठेंचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

उज्ज्वला हातागळे

सारांश :- अण्णा भाऊंचा स्त्रियांकडे, त्यांच्या विविध प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय उदात्त होता. त्यांनी कथा–कादंबऱ्यातून स्त्रीजगताचे वैपुल्याने जीवनचित्रण केले आहे. त्यांच्या एकूण 30–32 कादंबऱ्यापैकी 15 कादंबऱ्या स्त्रीप्रधान कादंबऱ्या आहेत. सर्वच कादंबऱ्यामध्ये स्त्रीयांना मानाचे स्थान दिले आहे. स्त्री–स्वभावचित्र रेखाटताना स्त्रीला कुठेही अपमानित, लाजिरवाणे केले नाही. 'चित्रा', 'वैजयंता', 'चंदन', 'चिखलातील कमळ', 'फुलपाखरू', 'रत्ना', 'टिळा लाविते मी रक्ताचा'. या स्त्रीप्रधान कादंबऱ्यातून व अनेक कथांमधून स्त्रीजीवनाचे दर्शन घडविले.

प्रस्तावनाः–

कुणी तमाशा कलावंतीण, कुणी झोपडपट्टीत राहणाऱ्या, कुणी वेश्या समजल्या जाणाऱ्या, कुणी मुरळी, तर कुणी भटके जीवन जगणाऱ्या यासारख्या स्त्रीयांचे शोषण इथली समाजव्यवस्था कशी करते, तिचे स्वातंत्र्य कसे हिरावून घेतले जाते, तिच्या भावनांचा कोंडमारा कसा होतो. त्यातूनही शीलरक्षणासाठी प्रसंगी महिषासूरमर्दिनीचे रूप घेऊन स्वतःचे रक्षण करते अशा करारी, बाणेदारवृत्तीच्या स्त्रियांचे चित्रण अण्णा भाऊंनी केले आहे. आपल्या कादंबऱ्यातून स्त्रीला एक आगळे–वेगळे स्थान अण्णा भाऊंनी दिले आहे. अण्णा भाऊंच्या मनात स्त्रीवर्गाबद्दल अपार कणव आहे. स्त्रीचं दुःख त्यांच्या मनात घर करतं. त्यांच्या दुःखांना वाचा फोडण्याचे काम अण्णा भाऊ साहित्यातून करतात. त्यांच्या नायिका ह्याा एकजात सत्वशील व्यक्तिमत्वाच्या आणि शीलरक्षण करणाऱ्या आहेत. त्या व्यभिचार करणाऱ्या नाहीत. स्त्रियांचा सन्मान करणे आणि त्यांच्याविषयी मनात आदर ठेवणे ह्या त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाची स्त्रीपात्रांच्या स्वभावचित्रणातून प्रचिती येते. अण्णा भाऊ स्त्रीयांकडे मानवतावादी दृष्टीकोनातून पाहतात. त्यांच्या नायिका एकजात सुंदर व सतशील वर्तन करणाऱ्या आहेत. त्या सर्व देखण्या, पाहणाऱ्यांची दृष्ट लागावी अशा आहेत. त्यांच्या सौंदर्याला त्यांचे चारित्र्य आणखी उठावदारपणा देते. सर्वांगसुंदर आहेत तरीही अण्णा भाऊंची लेखणी त्यांच्या सौंदर्याला उथळपणा येईल अशी घसरत नाही. सुंदर नायिका निर्माण करण्याचा पारंपरिक दंडक जरी अण्णा भाऊंनी गिरवला असला तरी देखील पारंपरिक स्त्रियांप्रमाणे फक्त चूल आणि मूल सांभाळणाऱ्या नाहीत. सामाजिक, कौटुंबिक अन्याय–अत्याचार सहन करीत मनात झुरत, कुढत बसणाऱ्या नाहीत तर त्या करारी, बाणेदार आहेत. 'अण्णा भाऊंनी निर्मिलेल्या कादंबऱ्यात त्यांच्या नायिका ह्या लक्षवेधी कर्तबगारी दाखवणाऱ्या आहेत. नायिका आणि नायक यांच्यातला भेद चटकन लक्षात येतो. नायक जितके तडफदार तितक्याच तेजस्वी वाटणाऱ्या त्यांच्या नायिका.' हे डॉ. गारोडे यांचे हे उद्‌गार अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनावर प्रकाश टाकतात.

अण्णा भाऊंनी स्त्री चित्रणाची परंपरागत शैली नाकारली. कारण स्त्रीने सर्व अन्याय–अत्याचार सहन करीत राहवे हा परंपरागत विचार त्यांना मान्य नव्हता. नशिबाचे भोग म्हणून कुढत न बसता प्रसंगी त्याच्याविरूध्द पेटून उठण्याची ताकद त्यांच्या नायकांप्रमाणे नायिकांमध्येही दिसते. अण्णा भाऊंच्या सहवासातील दिनकर साठे म्हणतात, "अण्णांच्या कथांमध्ये इथून तिथुन एकच झुंजार मराठबाणा आवेशाने स्फुरताना दिनकर साठेंचे विवेचन अण्णा भाऊंच्या लेखनाशी सुसंगत वाटते. अण्णांचे कादंबऱ्यातील नायिका नायक निर्भयवृत्तीचे, अन्यायाविरूध्द पेटून उठणारे असेच प्रकट केले आहेत, अण्णा भाऊंच्या नायिका स्वभावाने सुशिल असून कष्टकरी समाजातील आहेत. त्या संकुचित विचारसरणीच्या नाहीत. त्यांच्या विचारांची झेप मोठी आहे. त्या इतरांचा विनाकारण व्देष

करणाऱ्या नसून माणसाकडे 'माणूस' म्हणून पाहणाऱ्या आहेत. त्या प्रेमळ स्वभावाच्या, स्त्रीसुलभवृत्तीनुसार सोशिक आहेत. त्या घरंदाज असून पतीसुखासाठी तळमळणाऱ्या संसारी स्त्रिया आहेत. त्यांच्याकडे तिरप्या नजरेने पाहणाऱ्यांना त्या वठणीवर आणतात." अण्णा भाऊंना अन्यायाखाली भरडणारी स्त्री नको आहे. अत्याचाराने वाकलेली नको आहे. स्त्री ही बाणेदार आणि धाडसी असावी; किंबहुना ती तशीच असते. हा अण्णा भाऊंचा स्त्रीविषयक दृष्टिकोन त्यांच्या सर्वच कादंबऱ्यातून प्रतीत होतो. अण्णा भाऊंच्या नायिका मोकळ्या मनाच्या, सरळवृत्तीच्या, उदारमनाच्या, धाडसी, कर्तबगार असून समाजापुढे एक आव्हान उभे करणाऱ्या आहेत. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यातील सर्वच स्त्रिया आगंतुक येत नाहीत अथवा दुय्यमही नाहीत. त्या वाचकांच्या लक्षात राहणाऱ्या, त्यांना भुरळ पाडणाऱ्या आहेत. अण्णा भाऊंनी स्त्रियांना कादंबऱ्यांतून प्राधान्य दिले आहे. यावरून स्त्रियांचा गौरव करणे अण्णा भाऊंचा दृष्टिकोन आहे. अण्णा भाऊंची स्त्रीपात्रे मोडेन पण वाकणार नाही अशा वृत्तीची आहेत. त्यांनी स्त्रियांचे वर्णन करताना अस्मानी रंगाचे लुगडे, कांद्याच्या पातीसारखी चोळी, डाळिंबी रेशमी काकणं, गोरा रंग, बाकदार नाक, नाजूक ओठ, टपोरे डोळे, चमकदार दात, भिरभिरती चपळ नजर, भरदार छाती, बारीक कंबर, रसरशीत पोट, लांबसडक केस अशी सुंदर वर्णने समर्थपणे सजवली आहे. पण तिला निर्वस्त्र करून दाखविण्याचे दृष्कृत्य त्यांच्या हातून घडले नाही. अण्णा भाऊंचा भारतीय स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वच्छ व तरल होता. कथा–कादंबऱ्यातून स्त्रियांवर गुदरणारे अनेक वाईट प्रसंग त्यांनी अत्यंत संयमाने वर्णिले आहेत. स्त्रिची अब्रू लुटणारी माणसं अनेक लेखकांनी रंगवली आहेत. परंतु अण्णा भाऊंनी भयानक व राकट दरोडेखोरांच्या हातून स्त्रिची अब्रू वाचविताना दिसतात. "अण्णा भाऊंच्या साहित्यातील स्त्री पात्रांची इज्जत व अब्रूचे रक्षण होताना दिसते." अण्णा भाऊंनी स्त्रिचे व्यक्तिदर्शन जे घडविले त्यामध्ये तिच्या मनातील सोज्वळताच अधिक पकडली आहे. तिच्या मनातील भावसौंदर्य सहज उलगडून दाखविले आहे. अण्णा भाऊंनी सर्वच कादंबऱ्यातून स्त्रियांचे केलेले वर्णन उदात्त दृष्टिकोनातून केले आहे. त्यांच्या सर्वच स्त्री व्यक्तिरेखा संघर्ष करताना दिसतात. उदा. 'तू जीव वाचू नकं पण अब्रू वाचलीच पाहिजे.' (वैर'/पृष्ठ–66) 'माणसानं जिवाच्या मोलानं अब्रू जपावी आणि तु आपली अब्रू त्याच मोलानं जप.'(चित्रा'/पृष्ठ–48) हा अण्णा भाऊंचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. त्यांचे नायकही स्त्रीची अब्रू लुटत नाही. त्यांचा संघर्ष सन्मानाने जगण्यासाठी असतो. उदा. 'आई! थांब. मी खजिना न्हेणार हाय. तुम्हास्नी ओरबाडायला आलो न्हाय. कारण अब्रू खाऊन उपाशी माणसं जगत नसत्यात. जावा आपल्या घरात बसा.' (फकिरा'/पृष्ठ–104) हे फकिराचे उद्‌गार अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाची प्रचिती आणून देतात.

अण्णा भाऊंच्या नायिका तमाशात नाचणाऱ्या असो (उदा. वैजयंता, चिखलातील कमळ) किंवा जगण्यासाठी ढोरासारखे कष्ट करणाऱ्या असो. प्राणपणाने लढतात. " अण्णा भाऊंच्या साहित्यातील स्त्रीदर्शन गंभीर आणि भारतीय जीवनातून उभ्या राहिलेल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाला गौरवास्पद आहे." हे डॉ. बाबुराव गुरवांचे अण्णा भाऊंच्या स्त्रीपात्रांविषयीचे विवेचन समर्पक वाटते. न्याय, निर्भय, निःस्वार्थी समाजव्यवस्था निर्माण व्हावी हा अण्णा भाऊंचा ध्यास होता. त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखा व्यक्तिगत पातळीवर तशा वागतात. त्यासाठी जी संकटे, आपत्ती येईल त्यांच्याशी त्या धैर्याने सामना करतात. त्यांनी सुंदर शीलवती, चारित्र्यवान व धाडसी अशा नायिका कथा–कादंबऱ्यातून चित्रित केल्या आहेत.

अण्णा भाऊ हे चळवळीत वाढले. समाजवादी विचारसरणीचा त्यांनी स्वीकार केला. ते ज्या भागात राहत तेथे कामगार, मजूर, दुर्बल समाज जीवन त्यांनी जवळून पाहिले. जगण्यासाठी लढणारी माणसे पाहिली. ज्या खेड्यात ते जन्मले तिथे सरंजामी मनोवृत्ती, दबलेल्या प्रवृत्ती, हीन–दीन अवस्थेतील दलित, वंचित, भटका समाज पाहिला, अनुभवला, ते स्वतः आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील त्यामुळे समाजातील विषमतेविरूध्द, अन्यायाविरूध्द, बंड करण्याची वृत्ती बनली. जुलूम, जबरदस्तीला विरोध करणारी व भयग्रस्त स्थितीत जगणारी अशी दोन्ही प्रकारचे समाजजीवन अवलोकित केले होते. त्यातूनच त्यांनी आपल्या नायिका चित्रीत केल्या. उदा. 'बरबाद्या कंजारी' कथेतील नायिका 'निल्लू' समाजातील परंपरेला छेद देऊन स्वतःच्या विचारस्वातंत्र्याप्रमाणे निर्णय घेते. तिला नवरा मेल्यावर, तेही फसवणूक करून लग्न झालेल्या नवऱ्याच्या घरात जन्मभर कुढत बसणे मान्य नाही. जातपंचायतीचा विरोध पत्करून तिचा बाप 'बरबाद्या' ही परिवर्तनाच्या प्रवाहात स्वतःला झोकून देतो. अन् जातपंचायतीविरूध्द बंड पुकारून आपल्या मुलीला 'माणूस' पणाने वागण्यास खंबीर पाठिंबा देतो. अण्णा भाऊंचा स्त्री विषयक चित्रणाचा दृष्टीकोन येथे स्पष्ट होताना दिसतो.

अण्णा भाऊंच्या नायिका गावकुसाबाहेरील उपेक्षित समाजातील त्याचबरोबर बहुजन समाजातील असून त्यांना दडपशाही करणाऱ्याच्या प्रवृत्तीबद्दल चीड आहे. त्याविरूध्द त्या पेटून उठतात. संघर्ष करतात. वीरांगणा व नितिसंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या संसारी स्त्रिया आहेत. कादंबरी विश्वातील नायिका 'मनस्वी' आहेत. परंतु मनस्वीपणाची त्या चैन करीत नाहीत तर समाजजीवनात बंदिस्त असलेल्या स्वातंत्र्यासाठी व अस्मितेसाठी

जबरदस्त संघर्ष करणाऱ्या व विजयी होणाऱ्या त्या 'मनस्विनी' आहेत. "असामान्य, अलौकिक नसली तरी साधी, कुठल्याही सामान्य कुटुंबात आढळणारी आहे. परंतु स्वतःच्या मताने जीवन जगण्याच्या तिच्या अधिकाराची पायमल्ली होताच रणरागिणी होऊन लढणारी ती मनस्विनी आहे." प्रा. इंदिरा आठवले यांचे हे विचार समर्पक वाटतात. केवळ स्त्रीच्या सौंदर्याचे चित्रण केले नाही तर तिच्या स्वाभिमानी, करारी, लढावू बाण्याचे दर्शनही अण्णा भाऊंनी घडविले आहे. उदा. त्यांच्या 'वैर' कादंबरीतील गुणा आणि 'कुरूप' मधील हरणा शीलरक्षणासाठी अब्रू लुटण्यासाठी हैवानाला यमसदनी पाठवितात. 'वारणेच्या खोऱ्यात' मधील मंगला, 'माकडीचा माळ' मधील दुर्गा, 'चंदन' मधील चंदन, 'चित्रा' मधील चित्रा आणि 'आवडी' मधील आवडी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय व पिळवणुकीविरूध्द बंड पुकारतात. अशा लढाऊबाण्याच्या जीव घेणाऱ्या, प्रेमासाठी प्रियकरावर जीव ओवाळून टाकणाऱ्या त्या चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या मराठमोळ्या स्त्रीया आहेत. हे चित्रण अण्णा भाऊंनी स्त्रीवर्गाबद्दलचा गौरव करण्याच्या उदात्त हेतूने केले आहे. "स्त्रिला चारित्र्य आणि ते सांभाळण्याचे लढाऊ सामर्थ्य असते. ती अबला नसून क्रांतीकरी सबला आहे. याची मराठी साहित्यात ठळक नोंदणी आपल्या स्त्री पात्रांव्दारे अण्णा भाऊंनी प्रथमच केली आहे." गीता, वैजयंता, तारा, हरणा, बिलवरी, आवडी, रत्ना, मयुरा अशा कितीतरी स्त्रीनायिका अण्णा भाऊंच्या कथा–कादंबऱ्यात आहेत. यासर्व स्त्री नायिका अण्णा भाऊंनी साहित्यात सहानुभूतीपूर्वक विचार केलेला आहे. अण्णा भाऊंनी आपल्या कथा–कादंबऱ्यांमध्ये स्त्री ही काही उपभोग्य वस्तू नाही किंवा सौंदर्य प्राशनाची वस्तू किंवा गुलाम नाही हे चित्रित केले. तिला एक अप्रतिम बाणेदार, करारी, शूर, नीतिवान अशा रूपात वाचकांसमोर सादर केले. "अण्णा भाऊंच्या नायिका ह्या भांडवलदारी नायिकांप्रमाणं चड्ड्या, पॅट घालून धिंगाणा करणाऱ्या नाहीत किंवा स्त्री स्वातंत्र्य मागणाऱ्या नाहीत. तर आपल्या स्त्री मर्यादा सांभाळून प्रसंगी स्त्रीचं विराट रूप धारण करीत स्त्री जीवनाची जपणूक करणाऱ्या आहेत. उदात्त, ध्येयवाद, पावित्र्य, मांगल्य, उदात्त नितीमत्ता व स्वाभाविक जपणाऱ्या आहेत." हे नानासाहेब कठाळे यांचे अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाविषयीचे विवेचन समर्पक आहे.

अण्णा भाऊंनी शूर, कलावंत, सुलक्षणी, स्वाभिमानी नायिकांचे चित्रण केले. त्यांच्या नायिका सुशिक्षित नव्हत्या तरीही सुसंस्कृत होत्या. अशा नायिकांचे चित्रण वेधकपणे केले आहे.

शीलरक्षणासंबंधी अण्णा भाऊ म्हणतात, "स्त्रियांच शील काचेच्या भांड्याप्रमाणं नाजुक असतं. फुटलेले काचेचं भांड पुन्हा सांधता येत नाही तव्दतच स्त्रियांचचं भ्रष्ट झालेलं शील पुन्हा पवित्र करता येत नाही. परंतु यासाठी माणसाच्या मनाची तयारी मात्र पाहिजे." म्हणूनच अण्णा भाऊंनी आपल्या या विचारानुसार मनाची तयारी असलेला सैन्यामध्ये देशासाठी रणांगणावर लढणारा 'यशवंत' हा 'रत्ना' या कादंबरीतून एक आदर्श व्यक्ती म्हणून उभा केला.

'रत्ना' ही नायिका यशवंतची पत्नी असते. युध्दप्रसंगी यशवंतला लग्नानंतर लगेचच युध्दासाठी बोलावणे येते. यशवंतचा मित्र विनायक हाही सैन्यात परंतु मित्र युध्दात गुंतल्याचा गैरफायदा घेत रत्नाला यशवंतचा निरोप देण्याच्या विचाराने बोलवून रत्नाशी असभ्य वर्तन करतो. व तिच्यावर बलात्कारही करतो. बलात्कारामुळं सासरच्या मंडळींनी हाकलून दिलेली रत्ना खंबीरमनाने जगत राहते. तिचा दोष नसताना तिच्यावर झालेल्या अन्यायाविरूध्द लढत राहते. आपल्या पतीला सत्य सांगण्याचे धाडस करते. यशवंत घरी परतल्यावर झाला प्रकार रत्नाने कथन केल्यावर मोठ्या मनाने यशवंत रत्नाला पत्नी म्हणून स्वीकारतो. हा अण्णा भाऊंची स्त्रीयांबाबतची 'मानवता' हा दृष्टीकोन प्रत्ययास येतो.

अण्णा भाऊंच्या नायिका जेवढ्या प्रेमळ तेवढ्या तापटही 'माकडीचा माळ' कादंबरीतील यंकू माकडवाल्याची 'दुर्गा' नावाप्रमाणे दुर्गावतार धारण करते. कारण राधानगरीचा पोलीस पाटील रंगराव दुर्गाला काळगावला एका बोलीत अडवून म्हणतो, "तुझ्यासारखी देखणी पोरगी माझ्या खोऱ्यातून सहसा सलामत सुटत नाही. पण तू नशीबवाली आहेस नि दुर्देवीही आहेस." तेव्हा दुर्गावतार धारण करून भडकते आणि त्याला म्हणते, "मी गरीबाची लेक पडले. न्हाय तर मी तुला ठारच मारलं असतं." म्हणजेच अण्णा भाऊंना अपेक्षित अशाच परखड स्त्रीनायिका वाचकांसमोर उभ्या केल्या. 'चित्रा' व 'चंदन' या कादंबरीतील नायिक झोपडपट्टीत राहतात. आभाळभर दुःख डोक्यावर घेऊन परिस्थितीशी सतत भांडत असतात. त्या स्वतःच कणखरपणे वागतात. दुसऱ्यांनाही जगवण्यासाठी धडपड करतात. येथे अण्णा भाऊंची नायिका शूर आहे. जगाची पालनकर्ती आहे. देवदासी जीवनावर अण्णा भाऊंनी 'वैजयंता' कादंबरी लिहिली. परंतु देवदासींबद्दल असणारी श्रध्दा म्हणते ती एक कलावंतीन आहे. प्रथम ती स्त्री आहे. स्त्रीत्व मनात ठेवून जगण्यासाठी धडपडणारी स्त्री त्यांनी चित्रीत केली आहे. समाजात स्त्रीचं सन्मानपूर्वक जीवन जगू पाहणारी स्त्री अण्णा भाऊंना अभिप्रेत आहे.

"अण्णा भाऊंना आपल्या कथेतील नायिकांविषयी अपरंपार व कणव आहे. तिच्या दुःखमुक्त व स्वतंत्र जीवनाचा अविष्कार अण्णा भाऊंच्या कथा–कादंबऱ्यात प्रकर्षानं जाणवतो." हे नानासाहेब कठाळे यांचे विवेचन

अण्णा भाऊंनी स्त्रीनायिकांचे यथार्थ केलेल्या चित्रणाला पुष्टी देणारे आहे. अण्णा भाऊंच्या कथा–कादंबऱ्यातील अनेक व्यक्तींना नैतिक मूल्याचे पाठबळ आहे. याचा अर्थ प्रथम अण्णा भाऊंनी नैतिक मूल्यांचे सामर्थ्य जाणले होते. नैतिक मूल्यांची जोपासना व्हायला हवी ही त्यांची श्रध्दा होती. नीतिधैर्यच माणसाला प्रसंगी विलक्षण बळ देते. या विचारानेच स्त्रीनायिकांनी शील संवर्धनाचे मूल्य महत्त्वपूर्ण मानून जीवनजगण्याचा यशस्वी प्रयत्न केला. याचे वेळोवेळी अण्णा भाऊंनी चित्रण केले आहे.

"मानवी मनातील मूलभूत प्रवृत्तींना आवाहन करण्याचे सामर्थ्य साहित्यात असते. श्रेष्ठ साहित्यात असते. हे सामर्थ्य अण्णा भाऊंनी ओळखले होते. म्हणूनच त्यांच्या कथा– कादंबऱ्यात हे सामर्थ्य आहे." हे डॉ. सदा कराडे यांचे विवेचन अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाशी संयुक्तीक आहे. व अण्णा भाऊंच्या साहित्यिक श्रेष्ठत्वाबाबतचे हे विवेचन समर्पक आहे. अण्णा भाऊ कथा–कादंबऱ्यातील नायिकांच्या व्यथा–वेदनांचे, अपेक्षा–आकांक्षांचे व त्यासाठी अविरत चालणाऱ्या संघर्षाचे रेखाटन करतात म्हणूनच त्यांच्या कादंबरीची दिशा परिवर्तनसन्मुख व समाजाभिमुख आहे याची खात्री पटते. "अण्णा भाऊंनी नायिका रंगवताना अनेक पैलू स्पष्टपणे रेखाटलेले आहे. या नायिका नारी समाजाच्या खऱ्या सवरूपातल्या प्रतिनिधित्व करणाऱ्य आहेत हे निश्चित आहे." श्रीमती तारा रेड्डी, प्रा. इंदिरा आठवले यांचे विवेचन अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक दृष्टीकोनातील कादंबऱ्याचे समर्थन करतात. अण्णा भाऊंनी एकूण 15 स्त्रीप्रधान कादंबऱ्यातून स्त्री प्रश्नांना वाचा फोडली. 'चित्रा' ही 1951 मध्ये प्रकाशित झालेली कांदबरी मुंबईसारख्या महानगरात सुंदर स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, पैशाच्या पाठीमागे लागलेला लाचार मनुष्य आपल्याच रक्ताच्या स्त्रियांची मुंबईच्या बाजारात कशाप्रकारे विक्री करीत होता. अशा वेळी या स्त्रियांची मानसिकता अण्णा भाऊंनी 'चित्रा' मधून रेखाटली. स्त्रियांच्या प्रश्नांना हात घातला. 'चित्रा' ही स्त्रीप्रधान कादंबरी करतणूकप्रधान नसून ती समाजातील एक धगधगीत सत्य मांडून जाणारी कादंबरी आहे. 'चित्रा' नंतरची त्यांची वैजयंता ही लक्ष वेधून घेणारी कादंबरी आहे. अण्णा भाऊंनी तमाशा ही कला भोगली. तमाशा व तमाशा कलावंतांचा प्रश्न हाताळणारी मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणावी लागेल. वैजयंता कलावंतीन आहे म्हणूनच ती सर्व प्रसंगात आपले शील सांभाळण्यात यशस्वी होते. 'वैजयंतानंतर' एक लढाऊ कामगार स्त्रीचे जीवन–दर्शन घडवणारी 'चंदन' ही कादंबरी चंद नही नायिका झोपडपट्टीत राहणारी एक कामगार स्त्री आहे. बरीच प्रतिकूल परिस्थिती असताना ती एकटी सक्षमणे जीवन जगते. शीलसंवर्धनासाठी सतत दक्ष राहते. 'चिखलातील कमळ' या कादंबरीतून अण्णा भाऊंनी 'मुरळी' या प्रथेवर प्रकाश टाकला, देवाच्या नावावर स्त्रिचा भोग घेण्याची परंपरा सत्यरूपाने मांडले आहे. याशिवाय 'आवडी,' 'रूपा' 'रत्ना' या कादंबऱ्यातून घरंदाज, ग्रामीण कुटूंबातील सुंदर नायिका व त्यांचा जीवनसंघर्ष चित्रित केला आहे.

समाजातील विविध स्तरातील स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या व्यथा, त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार अण्णा भाऊंनी कादंबऱ्यातून चित्रित केले. ते स्वतःच भोगत असलेले जीवन व त्यांच्या अवतीभोवती कुटूंबात, नात्यागोत्यात दिसत असलेले प्रश्न त्यांना भेडवसावत असत. अन्यायाच्या विरोधात लेखणी चालवण्याची ताकद त्यांच्या संस्कारांनी दिली. स्त्रीवर्गाकडे, जीवनाकडे, त्यांच्या विविध प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टीकोन अतिशय उदात्त होता. स्त्री व्यक्तिमत्त्वे रेखाटताना कुठेही अपमानित लाजिरपणे चित्रण केले नाही. जात, धर्म, पंथ, वर्णाचा भेदभाव पाळला नाही. त्यांनी साहित्यातून स्त्रियांना मानाचे स्थान दिले.

एकंदरीत, अण्णा भाऊ साठे सांगली जिल्ह्यातील वाटेगावी दलित कुटूंबात जन्मले. दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णा भाऊंनी स्वयंप्रेरणेने अक्षर ओळख करून घेतली. ओळखीच्या व्यक्तीकडून शिक्षित होण्याचे धडे घेतले. व स्वकर्तुत्वावर महाराष्ट्राचेच नव्हे तर जागतिक किर्तीचे लेखक झाले. त्यांनी पोवाडा, शाहिरी, लोकनाट्ये, नाटके, कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णन हे बहुविध साहित्यप्रकार हाताळले. त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वामुळे रशिया, पॅरिस येथील निमंत्रणे त्यांना मिळाली. रशियामध्ये त्यांचे जल्लोषात स्वागत झाले.

आंतरराष्ट्रीय किर्तीच्या या साहित्यिकाने वाङ्मय क्षेत्रात समतेचे लढे उभे केले. स्त्रीप्रधान कथा–कादंबऱ्यांची निर्मिती केली. त्यात 'स्त्री' चे नवे रूप स्पष्ट करताना नव्या युगातील नवी स्त्री अन्यायाविरूध्द लढाऊ बाण्याची उभी केली. देशाचे स्वातंत्र्य, स्त्रीचे चारित्र्य, व पुरूषांचा स्वाभिमान या उद्देशाने प्रेरित साहित्य निर्माण केले. वर्षानुवर्षे बाद केलेली माणसे साहित्यातच नव्हे तर जीवनाच्या प्रांगणात सन्मानित केली. अण्णा भाऊ अष्टपैलूपणाचे व साहित्यिक सामर्थ्याचे धनी होते. अनेक साहित्यप्रकार त्यांनी हाताळले. त्यांची मूळ प्रकृती कथा–कादंबरीकाराची होती. ते एक जातिवंत कलावंतही होते. नवीन विषयाची खाणच जणू मराठी साहित्यक्षेत्रात त्यांनी उघडलेली होती. मराठी साहित्याचे केंद्र अण्णा भाऊंनी नागरी मध्यमवर्गाकडून ग्रामीण जनतेकडे तसेच अस्पृश्य, दलित, भटक्या, आदिवासी समाजाकडे वळवले. तमाशाचे रूपांतर लोकनाट्यात करून समाजप्रबोधन केले. त्याला प्रतिष्ठा, गांभिर्य व सामाजिक मान्यता मिळवून दिली. शोषित, वंचितांना 'माणूसपण' दिले. वर्ण, धर्म, जात, पंथ यांचा भेद न करता समाजव्यवस्थेने दुर्लक्षित केलेल्या समाज घटकांना साहित्यात स्थान मिळवून दिले.

साहित्यात स्त्रियांना मानाचे स्थान दिले. तिचे शोषित, पिडीत जीवन उलगडताना तिला सक्षमपणे जीवन जगण्याचा मंत्र दिला. एकंदरीत अण्णा भाऊंची वाङ्मयीन कामगिरी अतुलनीय आहेत.

संदर्भग्रंथ –

1. अण्णा भाऊंचे कादंबरी विश्व , डॉ. प्रमोद गारोडे , कमल प्रकाशन अंबरनाथ, प्रथम आवृत्ती, 2006.
2. लोकशाहीर तथा लोकलेखक; अण्णा भाऊ साठे, संपा. आसाराम गायकवाड, प्रथम आवृत्ती, 1996.
3. अण्णा भाऊ साठे; समाजविचार आणि साहित्यविचार, डॉ. बाबुराव गुरव, लोकवाङ्मय गृहप्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, जुलै 1999.
4. लोकराज्य 1 नोव्हें. 1993 चा अंक, संपा. दिवाकर गंधे.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org